महाराष्ट्र टाईम्स
ठाणे १५/३/१८

# बालवैज्ञानिकांची विज्ञान सफर

ठाणे :सरस्वती मंदिर ट्रस्टच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेने आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनात लहानांसह मोठ्यांनाही विज्ञानाची आगळीवेगळी सफर घडली. खेळ आणि सोपे प्रकल्प यांच्या माध्यमातून विज्ञान शिकण्याची संधी या निमित्ताने मुलांना मिळाली.

प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते न करता शाळेतील बालवाडीतील विज्ञान प्रयोग सादर करणाऱ्या मुलांच्या हस्ते करण्यात आले. शाळेत एक वर्गखोली ही संकल्पना नसून प्रत्येक विषयाची वेगळी दालने आहेत. प्रत्येक दालनात त्या विषयाची संपूर्ण माहिती दिली जाते. खेळगटापासून ते मोठ्या शिशुवर्गापर्यंत विषय खुलवत, स्वानुभवातून शिकण्याची साधने व साहित्य अतिशय सुयोग्य पद्धतीने मांडली होती व शिक्षिका त्याबद्दल अतिशय सोप्या शब्दांत माहिती देत होत्या. प्रदर्शनात मुलांचे चित्रकला, हस्तकला, ठसेकाम, रंगकाम, कोलाज काम, चिक्कण मातीपासून केलेल्या विविध वस्तू यांचे अप्रतिम नमुने पहायला मिळत होते. त्यातून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती सादर होत होती. मुलांचे हे कलाविश्व शाळेतील शिक्षकांनी मांडले होते.